वेबसाईट अपलोड तारीख ०७/०२/२०१४

# मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित.

:: प्रधान कार्यालय ::
" मुंबै बँक भवन", २०७, डॉ.दादाभाई नौरोजी रोड,
फोर्ट , मुंबई ४०० ००१,  दूरध्वनी - २२६१७१ ५४ ते ५९

## पगारदार सहकारी संस्थांसाठी

# कर्ज धोरण

# मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित.
# पगारदार नोकरांच्या सहकारी पतसंस्थांसाठी कर्ज धोरण

३९/१९ वी संचालक मंडळ सभा दिनांक १७/०१/२०१४
ठराव क्रमांक : ६ **(दिनांक ०५/०२/२०१४ पासून लागू )**

## अ कॅश क्रेडिट कर्ज मर्यादा निकष

ज्या पगारदार सहकारी पतसंस्थांना शासकीय लेखा परिक्षणात "अ" ऑडिट वर्ग प्रदान करण्यांत आलेला आहे. अशाच संस्थांना त्यांचे स्वनिधीचे अनुक्रमे ६ पटीपर्यंत तर ज्या संस्थांना "ब" ऑडिट वर्ग प्राप्त झाला असेल अशा संस्थांना स्वनिधीच्या ५ पटीपर्यंत (स्वनिधी= वसुल भाग भांडवल + राखीव निधी + इमारत निधी वजा संचित तोटे ) कॅश क्रेडिट कर्ज मर्यादा एक वर्षासाठी मंजूर करण्यांत येईल. मात्र प्रत्यक्ष उचल संस्थेच्या अथकीत सभासद कर्ज येणेबाकीच्या ८०% पर्यंत देता येईल. तसेच संस्थेच्या मागील तीन महिन्याच्या सरासरी मासिक कर्ज वसुलीच्या १० ते १८० पटीपर्यंत अथवा संस्थेच्या पोटनियमातील तरतूदीनुसार व प्रत्यक्षात सभासदांना मंजूर करीत असलेल्या हप्त्यांच्या पटीत यापैकी जे हप्ते कमी असतील त्यांच्या पटीपर्यंत संस्थेची एकूण कर्ज मंजूरी पात्रता येईल. त्यामधून बँकेचे मागील मंजूर कॅश क्रेडिट कर्ज मर्यादा व मुदत कर्जाची येणेबाकी वजा जाता उर्वरित शिल्लक राहिलेल्या रक्कमे इतके अतिरिक्त मुदत कर्ज (जास्तीत जास्त एकूण १८० मासिक परतफेडीच्या हप्त्यांनी) किंवा कॅश क्रेडिट कर्ज मंजूर करता येईल. संस्था सहा महिन्यानंतर अतिरिक्त कॅश क्रेडिट कर्ज मर्यादेस पात्र राहील. ही मुदत तीन महिन्यापर्यंत खाली आणण्याचा अधिकार बँकेच्या संचालक मंडळास राहील.

ज्या संस्थांना यापूर्वी कॅश क्रेडिट कर्ज सुविधा मंजूर केली आहे. अशा संस्थांना त्यांचे कर्ज नुतनीकरणाचे वेळी मागील मंजूर मर्यादेपैकी ५०% रक्कमेचे मुदत कर्जात वर्गीकरण करण्यात येईल.

## ब मध्यम मुदत कर्ज (मासिक हप्तेबंदी)

पगारदार सहकारी संस्थांची एकूण मंजूरी पात्र मर्यादा आजमाविताना संस्थेची मासिक सरासरी वसुली तसेच मासिक परतफेड क्षमता लक्षात घेवून मागील ३ महिन्यातील सरासरी मासिक कर्ज वसुली रकमेच्या १८० पटीपर्यंत अथवा संस्थांचे पोटनियमातील तरतूद व प्रत्यक्ष सभासदांना मंजूर करीत असलेल्या हप्त्यांच्या पटीपर्यंत तसेच सभासदाचा शिल्लक असलेला सेवाकालावधी ग्राह्य धरून त्याच्या सरासरी हप्त्यांच्या पटीत, यापैकी जी कमी असेल तितक्या पटीपर्यंत मुदत कर्ज मंजूर करता येईल तसेच संस्थेची बाहेरून कर्ज उभारणेची शिल्लक मर्यादा विचारा घेवून कर्ज मंजूर करणेत येईल. (संस्थेची बाहेरुन कर्ज उभारणेची मर्यादा आजमाविताना सभासदांकडून स्विकारलेल्या निवृत्तीचे वेळी अदा करावयाच्या संचित ठेवी विचारात घेतल्या जातील)

संस्थांनी मागील बँक कर्जाचे १२ हप्त्यांची नियमित परतफेड केल्यानंतरच नविन अतिरिक्त मुदत कर्ज मंजूर करण्यात येईल. अतिरिक्त कर्ज मंजूर करताना संस्थेच्या एकूण कर्ज मंजूर पात्रतेतून, संस्थेची मागील कॅश क्रेडिट मंजूरी व मुदत कर्जाची येणेबाकी वजा करून पात्रता काढण्यात येईल. मात्र प्रत्यक्ष उचल कर्जदार संस्थेच्या अथकित सभासद कर्ज येणेबाकीच्या ८०% पर्यंत देण्यात येईल.

१) "अ" किंवा "ब" लेखापरिक्षण वर्ग प्राप्त असणा-या संस्थाच कर्ज मंजूरीस पात्र रहातील.

२) नव्याने स्थापन झालेल्या संस्थांचे बाबतीत नोंदणीनंतर प्रत्यक्ष ३ वर्षे कार्यान्वित होवून शासकीय लेखापरिक्षण पूर्ण झालेल्या संस्थांच कर्ज मंजूरीस पात्र होतील.

३) सभासद कर्ज थकबाकीचे शे.प्रमाण १०% पेक्षा जास्त असणा-या संस्था कर्ज मंजूरीस पात्र रहाणार नाहीत.

४) मंजूर मुदत कर्जाची उचल मंजूर तारखेपासून सहा महिन्याच्या आत करावयास पाहिजे. संपूर्ण उचल व वितरण प्रक्रिया कर्ज मंजूरी तारखेपासून सहा महिन्यात पूर्ण करणे आवश्यक राहील. सहा महिन्यानंतर कर्ज उचलीस मुदतवाढ देता येणार नाही. संस्थेस वाढीव कर्जाची गरज भासल्यास कर्जाचे मासिक १२ हप्ते परतफेड केल्यानंतर पुन:श्च नव्याने अतिरिक्त मुदत कर्ज मागणी अर्ज सादर करावा लागेल.

नव्याने नोंदणी झालेल्या संस्थांचे बाबतीत संस्था नोंदणीपासून ३ वर्षे कार्यान्वीत होवून, झालेनंतर शासकीय लेखापरिक्षण झालेल्या संस्थांच कर्ज मंजूरीस पात्र होईल.

मंजूर मुदत कर्जाची परतफेड समान मासिक परतफेडीच्या हप्त्याने करावयाची असून परतफेडीचे हप्ते प्रत्यक्ष उचलीच्यावेळी निश्चित करण्यांत येतील.

- सभासद कर्ज रोखे बेचन करून शाखेच्या दप्तरी ठेवणे आवश्यक राहील.

- संस्थेचे सभासद ज्या आस्थापनेत कामाला आहेत त्या संस्थेच्या मालकाला संस्थेस मंजूर झालेल्या कर्ज मंजूरी पत्राची प्रत पाठविण्यात येईल. कर्ज मंजूरी पत्राची प्रत मिळालेसंबंधी आस्थापनाची पोच (लेखी पत्रावर "Noted the contents" असे कंपनीमार्फत नमूद करून) घेणे आवश्यक राहील.

**कर्ज मागणी अर्ज (मुदत कर्ज )**

संस्थेस ज्या शाखेत खाते आहे. त्या शाखेतून, आवश्यक शुल्क भरुन, बँकेच्या विहित नमुन्यात खालील माहितीसह कर्ज मागणी अर्ज बँकेस सादर करावा लागेल.

१ संस्थेच्या पोटनियमाची अद्यावत दुरुस्तीसह सत्यप्रत -

२ प्रथम कर्ज मागणीच्या वेळी संस्थेच्या अध्यक्षांनी प्रमाणित केलेले संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र.

३ संस्थेच्या गतवर्षीच्या लेखा परिक्षण अहवालाची तसेच संस्थेने सादर केलेल्या तत्संबधी पूर्तता अहवालाची सत्यप्रत.

४ मागील तीन वर्षाचे वार्षिक अहवाल

५ संस्थेची मागील महिन्याची अद्यावत आर्थिक पत्रके (तेरीज, नफातोटा व ताळेबंद पत्रक)

६ बँक कर्ज मागणीबाबत संस्थेच्या कार्यकारी मंडळ सभेच्या ठरावाची सत्यप्रत - तसेच कर्ज मागणी अर्जावर व सादर करावयाच्या इतर कागदपत्रांवर सहया करण्याचे अधिकार दिले संबंधी ठरावाची सत्यप्रत (उपविधीनुसार)

८ कार्यकारी मंडळ सदस्यांची नावे, पत्ता व कर्जदार असल्यास कर्जाची तपशीलवार माहिती. (नमूना - नाव, कर्मचारी क्रमांक वास्तव्याचा पत्ता, गावचा पत्ता, दूरध्वनी क्रमांक, सेवानिवृत्ती तारीख, कर्ज येणेबाकी, थकबाकी.)

९ संपूर्ण वर्षातील मासिक कर्ज वाटप, कर्ज वसुलीची माहिती. (कर्ज मागणी अर्जासोबत सादर केलेल्या / आर्थिक पत्रिकेच्या आतील १२ महिन्याची)

१० दिर्घमुदत कर्जाची पगारातून येणारी वसुली मुद्दल, व्याज, इतर कपातीसह माहितीपत्रक.

११. सभासद कर्ज येणेबाकी थकबाकी यादी (बँकेच्या विहीत नमून्यात)

**कर्ज उचल**

संस्थेकडील अथकीत दिर्घमुदत/ मध्यम मुदत सभासद कर्ज येणेबाकीचा (एन.ओ.डी.सी.) विचार करुन सदर अथकीत कर्ज येणेबाकी रकमेच्या ८०% एवढी उचल, संस्थेने खालील कागदपत्राची व कर्ज मंजूरी पत्रातील नियमित व जादा अटींची पूर्तता केल्यानंतर दिली जाईल. संस्थेकडील अथकीत दिर्घमुदत /मध्यम मुदत कर्ज येणेबाकी यादी सादर करावी लागेल.

**उचलीच्या वेळी घ्यावयाची कागदपत्रे / दस्तऐवज**

१ संस्थेस मंजूर असलेल्या संपूर्ण कर्ज मर्यादेची विहीत "क" नमुन्यातील वचन चिठ्ठी (संपूर्ण रकमेची एक व उचल रकमेच्या स्वतंत्र वचनचिठया)

२ सातत्य हमीपत्र (आवश्यक त्या किंमतीच्या स्टॅम्पसह )

३ बँकेच्या कर्ज मंजूरी पत्रातील सर्व अटी मान्य केलेल्या ठरावाची सत्यप्रत तसेच अटी मान्यतेचे करारपत्र.

४ कर्ज उचलीचा कागदपत्रावर सहया करण्याचा अधिकार प्रदान केल्याबाबतचा संचालक मंडळाच्या ठरावाची प्रमाणित सत्यप्रत तसेच फ्लोटींग खात्यावर व्यवहार करण्याचे, सह्या करण्याचे अधिकार प्रदान केलेसंबंधी संचालक मंडळ ठरावाची सत्यप्रत. (उपविधीनुसार)

५ कर्ज रोखे/ वचनचिठया/ सभासदाने पगारातून कर्ज हप्ता व इतर वर्गणी कपात करणेबाबतचे आस्थापनाला दिलेले अधिकार पत्र, बेचन करून देण्याबाबत संचालक मंडळाचे ठरावाची प्रमाणित सत्यप्रत.

६ सभासदांकडून संस्थेने कर्जापोटी घेतलेले कर्ज रोखे/ वचनचिठ्ठी/ सभासदाने आस्थापनेस दिलेले पगार कपातीचे हमीपत्र बेचन करून, बेचन यादीसह शाखेस सादर करावे लागतील. व यासंबंधी संस्थेने आस्थापनेस लेखी कळवून यासंबंधी आस्थापनाची पोच (Noted the contents) याप्रमाणे शाखेस सादर करणे आवश्यक राहील. शाखा पातळीवर बँकेच्या वतीने बेचन केलेल्या कर्ज रोख्यांची माहिती आस्थापनास कळवून त्याची पोच घेतली जाईल.

७ इतर अनुषंगिक कागदपत्रे उदा. बँकेच्या विहीत नमून्यातील दस्तऐवज

८ कंपनीचे वा अस्थापना मालकाचे महाराष्ट्र सहकारी अधिनियम १९६० चे कलम ४९ अंतर्गत पगारातून कपातीचे हमीपत्र (कंपनीचे / अस्थापनाचे लेटर हेडवर )

**कॅश क्रेडिट मर्यादा व मुदत कर्ज अटी व शर्ती**
**(पगारदार नोकरांच्या संस्था)**

१ संस्थेस कर्ज उचल रक्कमेच्या ५ टक्के इतक्या रक्कमेचे बँकेचे भाग खरेदी करावे लागतील. (कॅश क्रेडिट कर्जाचे बाबतीत मंजूर कर्ज मर्यादे इतक्या रक्कमेच्या ५% व मुदत कर्जाचे बाबत कर्ज उचल रक्कमेच्या ५% प्रमाणे )

२ संस्थेने चालू सभासद येणेबाकीचे व अथकीत कर्ज रोखे व वचनचिठ्ठया बँकेच्या नावे बेचेन करुन बेचेन यादीसह शाखेस सादर करावे लागतील. कोणत्याही दिवशी बँक कर्ज येणेबाकी सभासद कर्ज येणे रक्कमेच्या ८० टक्के पेक्षा जास्त असणार नाही. तसेच (एन.ओ.डी.सी.दाखला) अथकीत येणे रक्कमेचा दाखला सभासद कर्ज येणेबाकी थकबाकी यादीसह (बँकेच्या विहीत नमून्यात) मासिक पध्दतीने शाखेस सादर करावा लागेल.

३ बँकेचा संस्थेच्या सर्व मालमत्तेवर प्रथम श्रेणीचा हक्क राहील. संस्थेला दिलेल्या कर्जापोटी येणे असलेल्या कर्ज रक्कमेसाठी संस्थेच्या कोणत्याही ठेव खात्यामधूनच कर्ज खाती वजावट करण्याचा हक्क बँक राखून ठेवीत आहे. तसेच संस्थेचे कागदपत्रे तपासणे,कामकाजातील त्रुटी पूर्तता करणे, इतर बँकातील खाती बंद करणे, कर्ज उचल प्रस्ताव दस्तऐवजासह दोन महिन्याचे आंत सादर करणेच्या सूचना देणे. इत्यादी बाबत लेखी सूचना देणेचा हक्क बँकेस राहील. तसेच अटीचे पालन समाधानकारक न झालेस येणेबाकी व्याजासह मागणी करणेचा अधिकार बँक राखून ठेवीत आहे.

४ बँकेला संस्थेकडे येणे असलेली कर्जावरील व्याजाची रक्कम कायदेविषयक खर्च, कमिशन इतर खर्च व संस्थेकडून वेळोवेळी वसूल करण्याच्या इतर रक्कमा संस्थेच्या कर्ज खात्यात नावे टाकण्याचा अधिकार बँकेस राहील.

५ संस्थेने वसुलीच्या रकमा बँकेच्या चालू खाती भरणा करणे आवश्यक राहील व सभासदांना कर्जाचे धनादेश या खात्यामधूनच देणे आवश्यक राहील.

६ संस्थेस गंगाजळीची संपूर्ण रक्कम या बँकेत मुदत ठेवीत स्वतंत्रपणे गुंतविल्यानंतरच कर्ज उचल देण्यात येईल.

७ संस्थेने सर्व प्रकारच्या विमा पॉलिसीज बँकेने वेळोवेळी टायअप केलेल्या विमा कंपनी कडून उतरविणे आवश्यक राहील.

८. संस्थेस कर्ज नुतनीकरण अर्ज सादर करणेस मुळ मुदतीनंतर एक महिन्याचा ग्रेस पीरिअड देण्यात येईल. मात्र तद्नंतर कर्ज नुतनीकरण अर्ज सादर न केल्यास प्रतिमहा रु.१२००/- लेट फी आकारण्यात येईल व सदरची रक्कम संस्थेच्या कर्जखाती नावे टाकून वसुल करण्यात येईल. मुदत कर्जास सदर अट लागू नाही.

९ संस्थेस बँक कर्जापोटी दरमहा देय असणारा हप्ता २० तारखेपर्यंत भरणा न केल्यास रु.१००००/- च्या आत रु.१००/-, रु.१०००१/- ते रु.५००००/- पर्यंत रु.२००/- व रु.५००००/- चे वरील रक्कमेच्या हप्त्यास रु.५००/- प्रमाणे लेट पेमेंट चार्जेस आकारले जातील व सदर रक्कम संस्थेच्या बचत / चालू खाती नावे टाकून वसुल केली जाईल.

१० थकीत कर्ज हप्त्यावर २% दराने जादा दंडाचे व्याज आकारण्यात येईल.

११ बँक कर्ज परतफेडीस संस्थेचे पदाधिकारी व पंचकमिटी सदस्य " जॉईन्टली ॲण्ड सेव्हरली जबाबदार राहतील अशा आशयाचा हमी करार बँकेस सादर करुन द्यावयांस लागेल. तसेच बँकेचे कर्ज बाकी असताना संस्थेच्या पदाधिकारी / पंचकमिटी सदस्यांमध्ये काही बदल झाल्यास सदर हमी करार नव्याने बँकेस सादर करावा लागेल."

१२ सभासदांना दिर्घ व मध्यम मुदत कर्जवाटप उपविधीतील तरतूदीनुसार क्रॉस चेकने करावे लागेल.

१३ संस्थेचे स्वतंत्र फ्लोटींग अकौंट उघडणेत यावे (मुदत कर्जाचे बाबतीत ) तसेच संस्थेकडून ज्यांना कर्ज अदा करावयाचे आहे असे कर्ज रोखे फ्लोटींग यादीसह सविस्तर तपशिलासह यादी तपासणीसाठी शाखेस सादर करावे लागतील व यादीनुसार सभासद कर्ज क्रॉस चेकने अदा करणेबाबत शाखास्तरावर नियंत्रण ठेवण्यात यावे. सदरचे कर्ज रोखे बँकेच्या नावाने बेचेन करुन शाखेच्या ताब्यात राहतील.

१४ संस्थेने सभासदांना कर्ज वाटप करण्यापूर्वी संबंधीत सभासदांचे नाव, पदनाम, नोकरीत रूजू झाल्याची तारीख, सेवेत कायम झाल्याची तारीख, सेवा निवृत्ती दिनांक, तसेच मंजूर करावयाची कर्ज रक्कम यासंबंधी, संबंधीत आस्थापनेस लेखी कळवून, आस्थापनाचे कन्फर्मेशन (मान्यता) घेतल्यासंबंधी पत्र कर्ज रोख्यासमवेत सादर करणे आवश्यक राहील. व आस्थापनाची १ प्रत बँकेस सादर करणे आवश्यक राहील. तसेच कर्जदार / जामिनदार यांना नोकरीतून कमी करणेसंबंधी नोटीस प्राप्त झाल्यास त्यानुसार संस्थेने बँकेस कळविणे बंधनकारक राहील.

१५ दिर्घ मुदत/मध्यम मुदत कर्जाचे रोखे बेचन करून शाखा दप्तरी ठेवणे बंधनकारक राहील.

१६ सभासद कर्जापोटी होणा-या आगावू वसुलीचा भरणा, संस्थेस मासिक हप्त्या व्यतिरिक्त, बँक कर्ज खात्यात करणे आवश्यक राहील.

१७ मंजूर मुदत कर्जाची उचल मंजूर तारखेपासून सहा महिन्याच्या आत करावयास पाहिजे. (संपूर्ण उचल व वितरण प्रक्रिया कर्ज मंजूरी तारखेपासून सहा महिन्यात पूर्ण करणे आवश्यक राहील. सहा महिन्यानंतर कर्ज उचलीस मुदतवाढ देता येणार नाही. संस्थेस वाढीव कर्जाची गरज भासल्यास मागील कर्जाची प्रथम उचल केल्यानंतर त्यापासून पुढील मासिक १२ हप्ते परतफेड केल्यानंतर पुन:श्च नव्याने अतिरिक्त मुदत कर्ज मागणी अर्ज सादर करावा लागेल.)

१८ संस्थेस कर्ज उचलीचे वेळी मागील महिन्याची अद्यावत आर्थिक पत्रके तसेच सभासद कर्ज येणेबाकी, थकबाकी यादी बँकेच्या विहित नमुन्यात सादर करणे आवश्यक राहील.

१९ संस्थेने मंजूर बँक कर्जातून वाटप करणार असलेल्या सभासद कर्जासंबंधी खालील नमुन्यातील मागणी यादी ( डिमांड लिस्ट ) उचलीच्या वेळी शाखेस सादर करणे आवश्यक राहील.

डिमांड लिस्ट

कर्ज प्रकार -

| अ. क्र. | कर्जदाराचे नाव व कर्मचारी क्रमांक | कर्ज मंजूर | | | | मागील कर्ज येणेबाकी | प्रत्यक्षात वाटप करावयाची कर्ज रक्कम | धनादेश क्रमांक | कर्जदाराची स्वाक्षरी | सेवा निवृत्ती दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | रक्कम | दिनांक | ठराव क्र. | हप्ते | | | | | |
| १ | २ | . ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |

२१ वरील पैकी कोणत्याही अटीत बदल करण्याचा वगळण्याचा अथवा जादा अट समाविष्ट करण्याचा अधिकार बँकेस राहील.